Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

५३ /२०२६

**विषय : ऑक्टोबर 2026 पासून शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे वेतन ई-कुबेर प्रणालीद्वारे अदा होणार असल्याने त्याअनुषंगाने मिळणारे वेतन व कपातींबाबत सूचना.**

**संदर्भ :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग / सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांचे ई-कुबेर प्रणालीद्वारे वेतन अदा करण्याबाबतचे दि.२६/१०/२०२६ रोजीचे पत्र.

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स. प्रशासकीय अधिकारी, सेवकानां कळविण्यात येते की, उपरोक्त शासनाच्या निर्देशानुसार ऑक्टोबर 2026 पासून विद्यापीठातील शासन मान्य वेतन अनुदानातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे वेतन शासनाच्या नवीन ई-कुबेर प्रणालीद्वारे थेट संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

यापूर्वी शासनाकडे वेतनाची देयके सादर केल्यानंतर वेतनाची रक्कम विद्यापीठास प्राप्त होत असे व त्यानंतर विद्यापीठाच्या प्रणालीद्वारे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या वजावटी करुन निव्वळ रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात जमा केले जात असे. तथापि, नवीन प्रणालीमध्ये वेतनाची रक्कम थेट संबंधितांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने त्यानुसार आवश्यक शिक्षक/सेवक यांची माहिती भरणे /अद्ययावत करण्याची कार्यवाही प्रशासनामार्फत प्राधान्याने/जलदगतीने सुरू आहे.

नवीन प्रणालीमध्ये वेतनातून होणाऱ्या शासकीय वजावटी (GPF/PT/Revenue Stamp/ DCP/NPS) या वजावटी नेहमीप्रमाणे होणार आहेत. परंतु *Non-Government Deductions* (शासकीयेतर कपाती) (एलआसी/जीआसएस/कल्याण निधी,कर्ज हप्ता/अग्रीम रक्कम, पतसंस्था, कंझ्युमर्स स्टोअर्स इ.) संदर्भात एकाच शिर्षकाखाली कपात करण्याची तरतूद असल्याने, अशा कपातींच्या रक्कमा प्रथम विद्यापीठाकडे जमा होणार आहेत, व त्यानंतर विद्यापीठास बँकेमार्फत संबंधितांना वितरित करावी लागणार आहे. त्यामुळे सदर कपातींच्या रक्कम विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थांना त्या वितरित करण्यासाठी अंदाजे एक आठवड्याचा कालावधी लागू शकतो, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

नवीन प्रणाली कार्यान्वित होत असल्यामुळे उद्भवू शकणाऱ्या तांत्रिक अडचणींच्या परिणामी वेतन जमा होण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबी विचारात घेऊन ज्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी विविध कर्जांचे हप्ते, विमा हप्ते, पतसंस्था किंवा इतर संस्थांचे हप्ते अथवा अन्य शासकीयेतर कपाती बाबत संबंधित संस्थांकडून रक्कम जमा करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित केलेली असल्यास, त्यांनी संभाव्य विलंब टाळण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी. युको बँकेडील सर्व वैयक्तीक कपाती संबंधीतांनी ECS व्दारे वर्ग करुन घेण्याबाबत युको बँकेस कळवावे.

ऑक्टोबर, २०२६ मधील वेतन शासनाकडून ई-कुबेर मधून वेळत होत नसल्याचे निदर्शनास आलेस पुढील महिन्यात दिवाळी सण विचारात घेऊन विद्यापीठ प्रशासनाकडून ऑक्टोबर, २०२६ चे वेतन प्रचलित पध्दतीने अदा करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे. प्रचलीत पध्दतीने वेतन अदा केलेनंतर शासनाकडून ई-कुबेर प्रणालीमधून ऑक्टोबर, २०२६ वेतन संबंधीताच्या बॅक खातेवर जमा झालेस सदर जमा झालेले वेतन/रक्कम विद्यापीठाच्या खातेवर परत करण्याबाबतचे शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

पुढील महिन्यात दिवाळी सण विचारात घेऊन वेतन वितरणाची प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन व लेखा विभाग सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत.

तरी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी वरील सूचनांची नोंद घेऊन आवश्यक ती दक्षता घ्यावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / 2231
दि. 31 OCT 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय
२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक
३) शिक्षक/शिक्षकेत्तर पतसंस्था, कझ्युमर्स स्टोअर्स, कल्याण निधी कक्ष
४) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक यांचे निदर्शनास आणावे.**